



जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे




दैनिक | वर्ष १ | अंक १८६ | सोमवार, २६ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त

### ज्येष्ठाला आमिष दाखवून दोन भामट्यांनी सोन्याची अंगठी केली लंपास

**पिंपरी, ता. २५ :** बिस्किटाचे वाटप करून पुण्य मिळवण्याचे आमिष दाखवून दोन भामट्यांनी एका ज्येष्ठ नागरिकाची सोन्याची अंगठी लंपास केली. ही घटना बुधवारी (ता. २१) सकाळी मोशीत घडली. या प्रकरणी ६५ वर्षीय व्यक्तीने भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दुचाकीवरील दोन अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन अनोळखी व्यक्तींनी फिर्यादीला रस्त्यात थांबवले. त्यांनी फिर्यादीला बिस्किटाचे पुडे आणि १५०० रुपये देऊन हे बिस्किट लोकांना वाटा आणि पैसे मंदिरात दान करा असे सांगितले. आरोपींनी फिर्यादीच्या पाया पडून त्यांना दानधर्माच्या जाळ्यात ओढले आणि त्यांचे हात हातात घेऊन बोलण्यात गुंतवले. याच दरम्यान त्यांनी फिर्यादीच्या हातातील ५० हजार रुपये किमतीची ८ ग्रॅम वजनाची गणपती बाप्पाची नक्षी असलेली सोन्याची अंगठी हातोहात काढून घेतली आणि तिथून पळ काढला.

# थेऊर-आव्हाळवाडी जिल्हा परिषद गटात विकासाऐवजी सहली व पार्ट्यांवरच खर्च

## निवडणूक आयोग कारवाई कधी करणार? अपक्षांनाही बाजी मारण्याची संधी

**लोणी काळभोर, ता. २५ :** थेऊर-आव्हाळवाडी जिल्हा परिषद गटात सध्या विकास कामांपेक्षा सहली, पार्ट्या आणि विविध प्रलोभनांवरच अधिक पैसा खर्च होत असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. पुणे-सोलापूर महामार्गावरील दैनंदिन वाहतूक कोंडी, पिण्याच्या पाण्याची समस्या, आरोग्य सुविधा आणि वीजपुरवठ्यातील त्रुटी यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे मात्र विद्यमान आमदारांपासून खासदारांपर्यंत कुणीही गांभीर्याने लक्ष देताना दिसत नाही. या पार्श्वभूमीवर निवडणूक रिंगणातील उमेदवारांनी विकासाच्या मुद्द्यांपेक्षा मतदारांना विविध आमिषे दाखवण्यावरच भर दिल्याचे चित्र आहे. मात्र, मतदारराजा सुज्ञ असून तो कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता विकासासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न करणाऱ्या उमेदवारालाच साथ देईल, अशी चर्चा सध्या या गटात सुरू आहे. त्यामुळे ऐन थंडीतही या गटातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी निवडणूक खर्चावर मर्यादा घातली आहे. त्यानुसार तीन स्लॅब निश्चित करण्यात आले आहेत. ज्या जिल्हा परिषदेत ७१ ते ७५ निवडणूक विभाग आहेत, त्या ठिकाणी जिल्हा परिषदेसाठी ९ लाख रुपये तर पंचायत समितीसाठी ६ लाख रुपयांची मर्यादा आहे. ६१ ते ७० निवडणूक विभाग असलेल्या जिल्हा परिषदांसाठी जिल्हा परिषदेसाठी ७.५ लाख व पंचायत समितीसाठी ५.२५ लाख रुपये खर्च मर्यादा ठरवण्यात आली आहे. तसेच ५० ते ६० निवडणूक विभाग असलेल्या जिल्हा परिषदांसाठी जिल्हा परिषदेसाठी ६ लाख व पंचायत समितीसाठी ४ लाख ५० हजार रुपयांची मर्यादा जाहीर करण्यात आली आहे.

मात्र, थेऊरआव्हाळवाडी जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील उमेदवारांनी या खर्च




थेऊर-आव्हाळवाडी जिल्हा परिषद गटात विकासाऐवजी सहली व पार्ट्यांवरच कोट्यवधींचा खर्च

मर्यादेला अक्षरशः केराची टोपली दाखवली असल्याचे चित्र आहे. आयोध्या, मथुरा, काशी व उज्जैन यांसारख्या धार्मिक स्थळांच्या सहली आयोजित करून मतदारांना आमिषे दाखवली जात आहेत. एका सहलीसाठी सुमारे ८० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंत खर्च होत असल्याची चर्चा आहे. तसेच विविध मंडळे व तरुणांच्या गटांसाठी दररोज ओल्या पार्ट्यांचा बेहिशोबी खर्च सुरू असल्याचे बोलले जात आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या नाकावर टिच्चून एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च होत असताना, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने निवडणूक आयोगाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. थेऊर-आव्हाळवाडी जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध भारतीय जनता पक्ष अशी थेट लढत पाहायला मिळणार आहे. भाजपकडून पुष्पलता प्रकाश सावंत यांना जिल्हा परिषद गटातून उमेदवारी देण्यात आली आहे. तर आव्हाळवाडी पंचायत समिती गणातून पूनम अशोक गायकवाड आणि थेऊर पंचायत समिती गणातून योगेश दत्तात्रय काकडे निवडणूक रिंगणात उतरले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून जिल्हा परिषद गटासाठी कोमल संदेश आव्हाळे यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली असून, आव्हाळवाडी पंचायत समिती गणातून सुष्मा संतोष मुरकुटे व थेऊर पंचायत समिती गणातून युवराज हिरामण काकडे निवडणूक लढवत आहेत.

### कांटे की टक्कर

थेऊर-आव्हाळवाडी जिल्हा परिषद गटात यंदाच्या निवडणुकीत अत्यंत चुरशीची आणि निर्णायक लढत पाहायला मिळणार आहे. या गटात भाजपच्या पुष्पलता प्रकाश सावंत आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोमल संदेश आव्हाळे यांच्यात थेट सरळ लढत होणार असून, दोन्ही उमेदवारांकडून प्रचाराला जोर आला आहे. आव्हाळवाडी पंचायत समिती गणात भाजपच्या पूनम अशोक गायकवाड यांच्यासमोर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुष्मा संतोष मुरकुटे यांचे आव्हान आहे. तर थेऊर पंचायत समिती गणात भाजपचे योगेश दत्तात्रय काकडे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे युवराज हिरामण काकडे यांच्यात थेट मुकाबला रंगणार आहे. या गटात व दोन्ही पंचायत समिती गणांमध्ये प्रमुख पक्षांमध्ये थेट सामना होत असल्याने त्यांच्यात कांटे की टक्कर निवडणूक होण्याची चिन्हे आहेत.

**अपक्षही निवडणुकीच्या रिंगणात**

या जिल्हा परिषद गटात पल्लवी युवराज गायकवाड, कोमल पंकज आवाळे आणि ऋतुजा प्रकाश सावंत यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. या तिघींपैकी कोणताही उमेदवार आपला अर्ज कायम ठेवल्यास, भाजपच्या पुष्पलता प्रकाश सावंत आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोमल संदेश आव्हाळे यांच्यासमोर थेट आव्हान उभे राहणार आहे. त्यामुळे या गटातील लढत अधिक चुरशीची होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, आव्हाळवाडी पंचायत समिती गणात मीना सतीश आव्हाळे, दिपाली विकास कांचन, जयश्री उमेश गायकवाड, संग्राम मच्छिंद्र कोतवाल यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. तसेच थेऊर पंचायत समिती गणात सिद्धांत सचिन तुपे आणि प्रकाश दत्तात्रय घुले हे अपक्ष उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत.

पान २ वर

# स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांना राष्ट्रपती पदक जाहीर

**पुणे, ता. २५ :** पुणे ग्रामीण पोलीस दलातील कर्तव्यदक्ष व निर्भीड अधिकारी म्हणून ओळख असलेले स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांना ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला (२६ जानेवारी २०२६) उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याने पोलीस दलासह सर्वसामान्य नागरिकांतून समाधान व अभिमान व्यक्त होत आहे.

शिळीमकर यांनी मागील ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवाकालात मुंबई शहर, सातारा, नागपूर शहर गुन्हे शाखा, अहिल्यानगर विशेष शाखा तसेच पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत असताना अनेक गंभीर व संवेदनशील गुन्ह्यांचा छडा लावत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यात मोलाची भूमिका



बजावली आहे. पुणे ग्रामीण जिल्ह्यात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असताना उरुळी कांचन परिसरातील कुख्यात आप्पा लोंढे टोळीला जेरबंद करून त्यांनी परिसरातील गुन्हेगारीवर प्रभावी आळा घातला.

नागपूर शहरात कार्यरत असताना राजा गौस ऊर्फ गौस अली याच्या कुख्यात टोळीचा पर्दाफाश करत खून, दरोडा, खंडणीसह तब्बल ३८ गुन्हे उघडकीस आणले. त्याचप्रमाणे संतोष आंबेकर या दहशतवादी गुन्हेगाराच्या टोळीविरोधात ठोस कारवाई करून नागपूर शहरात शांतता प्रस्थापित करण्यात त्यांनी निर्णायक भूमिका बजावली.

अहिल्यानगर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या जनावरांची व शेतीमालाची चोरी करणाऱ्या सराईत टोळीचा स्वतः फिल्डवर उतरून छडा लावत शेतकऱ्यांना दिलासा दिला. कोरोना महामारीच्या काळात स्थलांतरित मजूर, सामान्य नागरिक तसेच पोलीस बांधवांसाठी आरोग्य, उपचार व उपजीविकेसाठी प्रभावी उपाययोजना राबविल्या.

नोव्हेंबर २०२२ पासून पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असताना त्यांनी दरोडे, जबरी चोरी, खून, आंतरराज्यीय गुन्हेगारी टोळ्या, ईव्हीएम चोरी, सामूहिक हत्याकांड, मोक्का व एमपीडीए कारवाया यामध्ये उल्लेखनीय यश मिळवले. ५८ अवैध अग्निशस्त्रे, अमली पदार्थांचा मोठा साठा जप्त करून गुन्हेगारीला ठोस आळा घालण्यात आला.

दरम्यान, शिस्तप्रिय, प्रामाणिक व जनतेशी सुसंवाद साधणारे अधिकारी म्हणून ओळख असलेल्या अविनाश शिळीमकर यांना यापूर्वी २०२४ मध्ये पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आले होते. आता राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याने त्यांच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली असून, पुणे ग्रामीण पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# भाजपच्या वाढत्या प्रभावामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ॲक्शन मोडवर

## शिवसेना पक्षात मोठे फेरबदल होण्याची शक्यता?

**पुणे, ता. २५ :** राज्यात नुकत्याच झालेल्या नगर परिषद आणि महापालिका निवडणुकांत महायुतीने वर्चस्व राखले असले, तरी भाजप पुन्हा एकदा क्रमांक एकचा पक्ष ठरला आहे. अनेक ठिकाणी भाजपने स्वबळावर किंवा मित्रपक्षांच्या तुलनेत अधिक जागा जिंकत आपली संघटनात्मक ताकद अधोरेखित केली.

याउलट, महायुतीतील घटक पक्षांना अपेक्षित यश मिळालेले नाही. विशेषतः शिंदेसेना अनेक ठिकाणी भाजपवर अवलंबून असल्याचे चित्र दिसून आले. राज्यातील काही महत्त्वाच्या नगर परिषदांमध्ये आणि महापालिकांच्या अनेक प्रभागांमध्ये शिंदे गटाची कामगिरी मर्यादित राहिली.

काही ठिकाणी त्यांना तडजोडीची




भूमिका घेत उपमहापौर पदावर समाधान मानावे लागले. त्यामुळे महायुतीत भाजपचा प्रभाव वाढत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे निकाल शिंदे गटासाठी धोक्याची घंटा मानले जात आहेत.या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ॲक्शन मोडमध्ये जात असल्याची माहिती आहे. संघटन मजबूत करणे, जिल्हा व तालुका पातळीवर पदाधिकारी बदलणे आणि पक्षाची स्वतंत्र ओळख ठळक करण्यावर भर दिला जाणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येते.

तसेच मंत्रिमंडळात खांदेपालट होण्याचे संकेतही मिळत असून काही मंत्र्यांच्या कामगिरीबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्रात शिंदे गट अपेक्षेप्रमाणे प्रभाव पाडू शकलेला नाही. जळगाव ग्रामीण मतदारसंघातील धरणगाव नगराध्यक्षपद हातातून गेल्याने मंत्री गुलाबराव पाटील यांच्यावर टीका होत आहे.

ज्यांनी मंत्रिपद दिले त्यांनी काढले तरी फरक पडणार नाही. पक्षाने जिथे गरज वाटेल तिथे निर्णय घ्यावा, अशी रोकठोक प्रतिक्रिया मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे मात्र शिंदेसेनेत खांदेबदल होणार का? या संदर्भात चर्चा सुरु झाल्या आहेत.

# ठेकेदारांना राजकारणात थारा नाही : उपमुख्यमंत्री अजित पवार

**बारामती, ता. २५ :** जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये यंदा तरुणांना संधी देण्यात आली आहे. राजकारणात ठेकेदारांना थारा देणार नाही. त्यांनी राजकारण करावे, नाही तर ठेकेदारी करावी, अशी भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी कण्हेरी येथील मारुती मंदिरात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचाराचा आरंभ केला. त्या वेळी ते बोलत होते.

अजित पवार म्हणाले, कार्यकर्त्यांची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे इच्छुकांची संख्या वाढली आहे. मात्र, या वेळी तरुण आणि सुशिक्षित उमेदवारांना संधी देण्यावर भर दिला आहे. यापूर्वी महिलांना संधी देण्यासाठी घरी जाऊन



विनंती करावी लागायची. आता महिला स्वतःहून पुढे येत आहेत. यंदा पीएच.डी. पदवी संपादन केलेल्या महिलेलाही संधी दिली आहे. मात्र, राजकारणात ठेकेदारांना थारा देणार नाही. त्यांनी राजकारण करावे, नाही तर ठेकेदारी करावी.

बारामतीचा विकास थांबणार नाही. बारामतीत ४३ कोटींची यशवंतराव चव्हाण अभ्यासिका, ३९४ कोटींचे आयुर्वेदिक महाविद्यालय, १ हजार कोटींची कऱ्हा-निरा उपसा सिंचन योजना, ४३८ कोटींची जनाई-शिरसाई बंदिस्त पाइपलाइन योजना, ३०० कोटींचे कर्करोग रुग्णालय, ७५ कोटींचे क्रीडा संकुल असे अनेक प्रकल्प सुरू आहेत. पुरंदर येथे छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ होणार आहे, असेही पवार म्हणाले.

**भरणे-पाटील एकत्र आले, तर काय बिघडले?**

इंदापूरमध्ये कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील एकत्र आले आहेत. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, काही लोक कान भरतात. मी हलक्या कानाचा नाही. १९९२ पासून निवडणुकीत आहे. इंदापूरमध्ये हर्षवर्धन पाटील, दत्तात्रय भरणे एकत्र आले, तर काय बिघडले?

# सोरतापवाडीत पूजा सणस निकाल फिरवणार?

**उरुळी कांचन, ता. २५ :** उरुळी कांचन-सोरतापवाडी-शिंदवणे पंचायत समिती गणात भारतीय जनता पक्षातील अंतर्गत नाराजी पुन्हा एकदा उफाळून आली असून, भाजपकडून अधिकृत उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या पूजा सणस यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे या गणातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या पंचायत समिती गणातून भाजपकडून सुदर्शन चौधरी व पूजा सणस हे दोघेही उमेदवारीसाठी इच्छुक होते. मात्र, पक्षश्रेष्ठींनी अधिकृत उमेदवारी सुदर्शन चौधरी यांना जाहीर केली. तिकीट न मिळाल्याने नाराज झालेल्या पूजा सणस यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविण्याचा निर्णय



घेतल्याचे समोर येत आहे. त्यांच्या या निर्णयामुळे भाजपच्या पारंपरिक मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणात विभाजन होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, उरुळी कांचन परिसरात भाजपमध्ये यापूर्वीच असंतोषाचे वातावरण निर्माण झाले होते. उरुळी कांचन जिल्हा परिषद गटासाठी भाजपने सुरुवातीला विनोद शिंदे यांना उमेदवारी जाहीर केली होती. मात्र ऐनवेळी त्यांचा पत्ता कट करून शंकर बडेकर यांना तिकीट देण्यात आले. या निर्णयामुळे भाजपमधील काही पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती.

अशातच आता उरुळी कांचन-सोरतापवाडी-शिंदवणे पंचायत समिती गणात पूजा सणस यांना डावलण्यात आल्याने त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्यामुळे भाजपमधील अंतर्गत विसंवाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. पक्षातील एकसंघतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, सध्या भाजपमध्ये फुटीर वातावरण निर्माण झाल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे.

राजकीय जाणकारांच्या मते, भाजपच्या मतांचे विभाजन झाल्यास त्याचा थेट फायदा विरोधी पक्षांना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ही निवडणूक केवळ उमेदवारांची लढत न राहता, भाजपच्या अंतर्गत राजकारणाचीही मोठी कसोटी ठरणार असल्याची चर्चा आहे.

### पक्षश्रेष्ठी नाराजांची समजूत कशी काढणार?

पूजा सणस व जीवन शिंदे हे दोन्ही नेते उमेदवारी न मिळाल्याने नाराज असून, त्यांनी निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर येत आहे. या दोघांनीही स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याची भूमिका घेतल्यास भाजपच्या मतांमध्ये मोठ्या प्रमाणात विभागणी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे पूजा सणस आणि जीवन शिंदे यांची समजूत काढण्यात पक्षश्रेष्ठींना यश येते की नाही, यावरच या गटातील व गणातील राजकीय गणिते अवलंबून राहणार असल्याचे बोलले जात आहे.

**भाजपमधील अंतर्गत मतभेद ठरणार निर्णायक**

भाजपमधील अंतर्गत विसंवाद आणि नाराजीचा थेट फायदा विरोधी पक्षांना होऊ शकतो. आधीच अटीतटीच्या लढती अपेक्षित असताना, भाजपची मते विभागली गेली तर विरोधकांसाठी विजयाचा मार्ग सुकर होऊ शकतो. त्यामुळे पक्षश्रेष्ठी वेळीच हस्तक्षेप करून नाराज नेत्यांची समजूत काढतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सध्या तरी पूजा सणस व जीवन शिंदे हे दोघेही निवडणूक लढविण्यावर ठाम असल्याचे संकेत मिळत असून, त्यामुळे भाजपसमोरील अडचणी वाढल्याचे चित्र आहे. आगामी काही दिवसांत पक्षांतर्गत हालचालींना वेग येणार असून, समेट होतो की संघर्ष अधिक तीव्र होतो, हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त

### पुणे-सातारा प्रवास बोगद्यामुळे अवघ्या ७ मिनिटांत होणार

**पुणे, ता. २५ :** पुणे-सातारा महामार्गावर प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. प्रवाशांचा कस पाहणारा आणि अनेकदा अपघातांना निमंत्रण देणारा 'खंबाटकी घाट' आता इतिहास जमा होण्याच्या मार्गावर आहे. खंबाटकी बोगदा प्रकल्पाचे काम आता शेवटच्या टप्प्यात आले असून, जून २०२६ पासून हा सहा पदरी मार्ग वाहतुकीसाठी पूर्णपणे सज्ज होणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील ४५ मिनिटांचा त्रासदायक प्रवास आता अवघ्या ७ मिनिटांवर येणार आहे.पुणे आणि सातारा या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणारा खंबाटकी घाट हा 'ब्लॅक स्पॉट' म्हणून ओळखला जायचा. घाटातील तीव्र वळणे आणि चढणीमुळे येथे अवजड वाहने अडकून पडायची, परिणामी तासनतास वाहतूक कोंडी व्हायची. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने यावर कायमस्वरूपी तोडगा म्हणून बोगदे आणि १ किलोमीटर लांबीचा भव्य दरीपूल बांधण्यात आला आहे. सध्या साताऱ्याकडून पुण्याकडे येणाऱ्या वाहनांसाठी एक बोगदा प्रायोगिक तत्त्वावर सुरू आहे. दरम्यान, संपूर्ण काम वेगाने सुरू असून, पावसाळ्यापूर्वी म्हणजेच जून २०२६ पर्यंत काम पूर्ण होईल.

### पाषाण येथे मॉर्निंग वॉकला गेलेल्या ज्येष्ठ महिलेला कारने चिरडले

**पुणे, ता. २५ :** पुण्यातील पाषाण परिसरात रविवारी पहाटेच्या शांततेत नेहमीप्रमाणे घराबाहेर पडलेल्या एका ६५ वर्षीय ज्येष्ठ महिलेचा भरधाव कारने चिरडल्यामुळे जागीच मृत्यू झाला. आशा पाटील घरातून सकाळी साडेसहाच्या सुमारास मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडल्या होत्या. चालत असताना, पाठीमागून आलेल्या एका अज्ञात भरधाव कारने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, आशा पाटील रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या आणि त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. एनसीएल इन्स्टिट्यूटसमोर हा अपघात झाला असून महिलेला धडक दिल्यानंतर तिला मदत करण्याऐवजी कार चालकाने तिथून पळ काढला. रस्त्यावर पडलेल्या महिलेला पाहून स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. चतुःश्रृंगी पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात चालकावर गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास सुरु आहे.

### पुणे जिल्ह्यातील ग्रामपंचायतीमध्ये प्रशासक राज?




**मुंबई, ता. २५ :** महाराष्ट्राच्या ग्रामीण राजकारणातून एक मोठी बातमी समोर येत आहे. राज्यातील हजारो ग्रामपंचायतींचा कार्यकाळ यावर्षी संपत असून, नव्या निवडणुका होईपर्यंत या गावांचा कारभार आता थेट सरकारी अधिकाऱ्यांच्या हाती जाणार आहे. राज्य सरकारने २३ जानेवारी रोजी अधिकृत पत्रक काढून जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ दरम्यान मुदत संपणाऱ्या ग्राम पंचायतींवर 'प्रशासक' नेमण्याचे आदेश दिले आहेत. ग्रामपंचायतीचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपला की नवी निवडणूक होणे गरजेचे असते. मात्र, अनेकदा तांत्रिक कारणांमुळे निवडणुकांना विलंब होतो. अशा काळात सरपंच आणि सदस्यांचे अधिकार संपुष्टात येतात. गावातील विकासकामे थांबू नयेत म्हणून सरकार प्रशासकाची नियुक्ती करते. आता ग्रामसभेत लोकप्रतिनिधींऐवजी सरकारी अधिकारी मुख्य निर्णय घेतील. ग्रामपंचायतीचे बँक खाते आणि सरकारी निधीचा वापर प्रशासकाच्या स्वाक्षरीने होईल. रस्ते, पाणीपुरवठा आणि स्वच्छतेची कामे प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली सुरू राहतील.

# लोणी काळभोर जिल्हा परिषद व पंचायत समितीत बंडखोरीचा भडका

## तिकीट कापल्याने उमेदवारांची भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता

**लोणी काळभोर, ता. २५ :** लोणी काळभोर जिल्हा परिषद गट व पंचायत समिती निवडणुकीत पक्षश्रेष्ठींनी घेतलेल्या निर्णयांमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, तिकीट कापलेल्या व डावललेल्या उमेदवारांचा संताप आता उघड बंडखोरीत रूपांतरित होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप या प्रमुख पक्षांमध्ये अंतर्गत नाराजी उफाळून येत असून, याचा थेट परिणाम निवडणुकीच्या निकालावर होणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

लोणी काळभोर जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारीसाठी अनिता गवळी, सिंपल कांबळे व शीतल कांबळे हे तीन दावेदार रिंगणात होते. मात्र, पक्षश्रेष्ठींनी अनिता गवळी व सिंपल कांबळे यांचे तिकीट कापत शीतल कांबळे यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली. या निर्णयामुळे राष्ट्रवादीत मोठी खळबळ उडाली.

तिकीट न मिळाल्याने संतप्त झालेल्या सिंपल कांबळे यांनी तात्काळ शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश करत उमेदवारी मिळवली, तर अनिता गवळी यांनी अपक्ष निवडणूक लढविण्याचा ठाम निर्णय घेतला. त्यामुळे राष्ट्रवादीच्या गोटात फुट पडल्याचे उघडपणे दिसत असून, बंडखोर उमेदवारांची भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

या गटात भाजपकडून पूनम बाबुराव गायकवाड, शिवसेना (उबाठा) कडून कलावती अश्रुबा धेले, बसपाकडून नीता संजय आवारे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर रुपाली अविनाश कोरे, अनिता सुर्यकांत गवळी, स्वाती गणेश थोरात यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केल्याने लढत बहुरंगी व अत्यंत चुरशीची झाली आहे.



दरम्यान, कदमवाकवस्ती-वडकी पंचायत समिती गणातही राष्ट्रवादी काँग्रेसच्या निर्णयामुळे नाराजीचा भडका उडाला आहे. या गणात राहुल जोगदंड, अमोल टेकाळे, अक्षय म्हस्के, प्रकाश भिसे व विजय दाभाडे इच्छुक असताना, पक्षाने अमोल टेकाळे यांना उमेदवारी दिली. परिणामी भारत मोहन पिसाळ, नितेश अंबादास लोखंडे यांच्यासह इतर इच्छुकांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरायचा निर्धार केल्याने राष्ट्रवादीच्या गोटात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भाजपमध्येही अशीच स्थिती असून, कदमवाकवस्ती पंचायत समिती गणात ज्ञानेश्वर नामुगडे यांना उमेदवारी दिल्याने नकुल शिंदे व राकेश लोंढे हे नाराज असल्याची जोरदार चर्चा आहे. लोणी काळभोर पंचायत समिती गणात भाजपच्या श्वेता काळभोर व राष्ट्रवादीच्या रेश्मा काळभोर यांच्यात थेट लढत होत असली तरी, शिवसेनेच्या नंदिनी कोळपे व अपक्ष विद्या दत्तात्रय गायकवाड यांच्यामुळे समीकरणे बिघडण्याची शक्यता आहे.

**नाराजांची भूमिका महत्त्वाची ठरणार?**

पक्षांतर्गत कलह, तिकीट कापण्याचे राजकारण आणि नेतृत्वाचा अभाव यामुळे मतदार संभ्रमात असून, याचा थेट फायदा अपक्ष उमेदवारांना होण्याची दाट शक्यता आहे. योग्य नेतृत्व न मिळाल्यास विकासाच्या समस्या सुटणार कशा, असा सवाल नागरिक विचारत आहेत. त्यामुळे या निवडणुकीत पक्षांपेक्षा नाराज व बंडखोर उमेदवारच बाजी मारणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


योग्य नेतृत्वाचा अभाव; समस्यांचा डोंगर सुटणार तरी कसा? लोणी काळभोर जिल्हा परिषद गट व पंचायत समिती परिसरात पाणीटंचाई, वाहतूक कोंडी, आरोग्य सुविधा, वीजपुरवठा, अंतर्गत रस्ते, कचरा व्यवस्थापन अशा मूलभूत समस्यांचा डोंगर उभा आहे. मात्र निवडणूक जवळ येऊनही या प्रश्नांवर ठोस भूमिका मांडणारे, जनतेशी थेट संवाद साधणारे सक्षम नेतृत्व अद्याप दिसून येत नाही. पक्षांतर्गत गटबाजी, तिकीट वाटपातील राजकारण व वैयक्तिक कुरघोडी यामध्येच बहुतांश नेते अडकले असल्याने विकासाचे प्रश्न दुय्यम ठरत असल्याची भावना मतदारांमध्ये निर्माण झाली आहे.

अपक्षांना बाजी मारण्याची संधी पक्षीय राजकारणातून वैतागलेल्या मतदारांचा कल आता स्वच्छ प्रतिमा, स्थानिक प्रश्नांची जाण आणि थेट संपर्क असलेल्या उमेदवारांकडे वळताना दिसत आहे. त्यामुळे नाराज कार्यकर्ते, बंडखोर नेते व स्थानिक पातळीवर प्रभाव असलेले अपक्ष उमेदवार यांना यंदाच्या निवडणुकीत मोठी संधी मिळू शकते. जर पक्षांनी अंतर्गत मतभेद आवरले नाहीत, तर मतं विभागले जाऊन अपक्ष उमेदवारच निकालाची दिशा ठरवतील, असा अंदाज राजकीय विश्लेषक व्यक्त करत आहेत.

# पुण्यातील लोहगाव येथील हवाई दलाच्या बेसमध्ये घुसखोरी करताना तरुण ताब्यात

**पुणे, ता. २५ :** पुण्यातील लोहगाव येथील हवाई दलाच्या अतिसंवेदनशील आणि प्रतिबंधित परिसरात बेकायदा प्रवेश करण्याचा प्रयत्न एका तरुणाला महागात पडला आहे. केवळ उत्सुकतेपोटी भिंतीवरून उडी मारून आत शिरण्याचा प्रयत्न करताना हा तरुण थेट जखमी झाला असून, त्याचा पाय फ्रॅक्चर झाला आहे. या प्रकरणी विमानतळ पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

नगर रस्त्यावरील टाटा गार्ड रूम परिसरालगत हवाई दलाचा सुरक्षित विभाग आहे. हा परिसर राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, येथे केवळ अधिकृत ओळखपत्र असलेल्या हवाई दलाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाच प्रवेश दिला जातो. मात्र २२ जानेवारी रोजी दुपारी सुमारे १२ वाजता २५ वर्षीय तरुणाने या संरक्षित भागाच्या भिंतीवर चढून आत प्रवेश करण्याचा धोकादायक प्रयत्न केला. भिंतीवर चढलेला हा तरुण गस्त घालणाऱ्या हवाई दलाच्या जवानांच्या नजरेस पडला. जवानांनी त्याला थांबवण्याचा प्रयत्न करताच, घाई आणि भीतीमुळे तो तोल जाऊन थेट भिंतीवरून खाली कोसळला.



या अपघातात त्याच्या पायाला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाले. जखमी अवस्थेत त्याला तातडीने हवाई दलाच्या रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आले.

चौकशीत या तरुणाने दिलेले कारण अधिकच धक्कादायक ठरले. हवाई दलाचा अंतर्गत परिसर कसा असतो, हे फक्त पाहण्यासाठी आपण आत शिरण्याचा प्रयत्न केला, असे त्याने अधिकाऱ्यांना सांगितले. कोणताही गैरउद्देश नसल्याचा दावा त्याने केला असला, तरी अशा ठिकाणी बेकायदा प्रवेश करणे गंभीर गुन्हा ठरतो. याप्रकरणी हवाई दलातील कनिष्ठ अधिकारी प्रदीपकुमार सिंह यांनी फिर्याद दिली असून, विमानतळ पोलिसांनी भारतीय न्यायसंहिता कलम ३२९ (३) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे, अवघ्या पंधरा दिवसांपूर्वीही अशाच प्रकारे प्रतिबंधित परिसरात घुसखोरी करणाऱ्या एका तरुणावर कारवाई करण्यात आली होती. सतत घडणाऱ्या अशा घटनांमुळे हवाई दलाच्या सुरक्षेबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले असून, नागरिकांनी अशा धाडसापासून दूर राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## अजित पवार महाविकास आघाडीत परतणार?: संजय राऊत

**पुणे, ता. २५ :** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या उलथापालथीचे संकेत मिळत असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येतील आणि उपमुख्यमंत्री अजित पवार पुन्हा महाविकास आघाडीत (मविआ) परततील, असा खळबळजनक दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत यांनी शनिवारी केला.



अजित पवार सध्या महायुतीत असले तरी त्यांचे मन अजूनही त्यांच्या कुटुंबासोबत आणि पर्यायाने शरद पवारांच्या सोबतच आहे, असे राऊत यांनी यावेळी नमूद केले. मुंबईत पत्रकारांशी बोलताना संजय राऊत यांनी राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांवर भाष्य केले.


आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादींनी घड्याळ या चिन्हावर एकत्र निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. याकडे लक्ष वेधत राऊत म्हणाले की, दोन्ही गट आता तांत्रिकदृष्ट्या एकत्र आले आहेत. अजित पवार दोन दगडांवर पाय ठेवून चालू शकत नाहीत, त्यांना शेवटी आपल्या मूळ प्रवाहात म्हणजेच महाविकास आघाडीत यावेच लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी राऊत यांनी महायुतीमधील अंतर्गत कलहावरही बोट ठेवले. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपमध्ये तणाव असल्याचे त्यांनी सांगितले.

## धमकी देत नातेवाईकांकडून शाळकरी मुलीचे अपहरण

**जालना, ता. २५ :** अंबड तालुक्यात नात्यातील लोकांकडूनच फसवणूक, धमकी आणि बळजबरी करत एका १९ वर्षीय तरुणीचे इच्छेविरुद्ध लग्न लावून देण्यात आल्याचा हा प्रकार आहे. शिक्षणासाठी घराबाहेर पडलेल्या तरुणीला दिवसाढवळ्या उचलून नेणे आणि तिच्या संमतीशिवाय विवाह लावून देणे, ही गंभीर सामाजिक आणि कायदेशीर बाब मानली जात आहे.

अंबड तालुक्यातील शहागड परिसरातील एका गावातील ही तरुणी दररोज गेवराई येथे महाविद्यालयीन शिक्षणासाठी जात होती. २१ जानेवारी रोजी सकाळी ती नेहमीप्रमाणे शहागड बस स्थानकावर उभी असताना तिच्याच नात्यातील काही व्यक्ती कारमधून तेथे आल्या. फिरायला जायचं आहे, आमच्यासोबत चल,



असं सांगत त्यांनी तिला गाठलं. मात्र कॉलेजला जायचं असल्याचं सांगत तरुणीने स्पष्ट नकार दिला. तरीही आरोपींनी जीवे मारण्याची धमकी देत तिला जबरदस्तीने कारमध्ये बसवलं.

यानंतर तिला थेट आळंदी येथे नेण्यात आलं. तिथे मंदिरात नेऊन तिच्या इच्छेविरुद्ध महेश राजेंद्र काकडे याच्याशी तिचं बळजबरीने लग्न लावून देण्यात आलं. संपूर्ण प्रकारात मानसिक दबाव, धमकी आणि भीतीचं वातावरण निर्माण करण्यात आलं होतं. लग्नानंतरही तरुणीने प्रसंगावधान राखत आरोपींशी गोड बोलून गावाकडे परतण्याची विनंती केली आणि संधी मिळताच त्यांच्या तावडीतून सुटका करून घेतली.

घरी परतल्यानंतर तिने घडलेला सर्व प्रकार आई-वडिलांना सांगितला. त्यानंतर गोंदी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या तक्रारीवरून महेश राजेंद्र काकडे, सोनू राजेंद्र काकडे आणि दोन महिलांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

या घटनेमुळे जालना जिल्ह्यात संतापाची लाट पसरली असून, शिक्षणासाठी बाहेर पडणाऱ्या मुलींच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. नात्यातील लोकांकडूनच असा प्रकार घडणं हे समाजासाठी अधिक चिंताजनक असल्याचं बोललं जात आहे.

## राज ठाकरे पुण्यात; शहराध्यक्षपदासह संघटनात्मक बदलांची शक्यता

**पुणे, ता. २५ :** पुणे महापालिका निवडणुकीत २०२६ मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला बसलेला दारुण पराभव हा केवळ एका निवडणुकीचा निकाल नसून, पक्षासाठी तो मोठा धक्का मानला जात आहे. एकेकाळी पुणे महापालिकेत २९ नगरसेवकांची ताकद असलेल्या मनसेला यंदा एकही नगरसेवक निवडून आणता न आल्याने पक्षाच्या संघटनात्मक आणि राजकीय अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील मनसेच्या कार्यकारणीत मोठे बदल होण्याचे संकेत वरिष्ठ नेत्यांकडून दिले जात आहेत.

या निवडणुकीत मनसेने पहिल्यांदाच शिवसेनेसोबत युती करून मैदानात उतरण्याचा प्रयोग केला होता. मात्र ही युती अपेक्षित प्रभाव पाडू शकली नाही. बदललेले राजकीय



समीकरण, प्रबळ प्रतिस्पर्धी पक्षांची संघटनात्मक ताकद आणि आर्थिक बळ यामुळे मनसेचा प्रचार तुलनेने कमकुवत ठरला, हे पक्षाने अप्रत्यक्षपणे मान्य केले आहे. मनसेचे सरचिटणीस हेमंत संभूस यांनी निकालानंतर दिलेल्या प्रतिक्रियेत पराभव स्वीकारत पक्षात आत्मचिंतन होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

या पराभवाचे महत्त्व यासाठी अधिक आहे की पुणे हे राज ठाकरे यांचे राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे शहर मानले जाते. गेल्या काही वर्षांत मनसेचा जनाधार कमी होत असल्याचे चित्र या निकालातून ठळकपणे समोर आले आहे. त्यामुळे आता केवळ व्यक्तीगत जबाबदाऱ्या नव्हे, तर संपूर्ण संघटन रचनेचा आढावा घेण्याची वेळ पक्षावर आली आहे.

महत्त्वाचे म्हणजे, राज ठाकरे लवकरच पुण्यात येऊन पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची थेट बैठक घेणार आहेत. या भेटीत शहराध्यक्षपदासह अनेक पदांमध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नव्या चेहऱ्यांना संधी देणे, जुन्या नेतृत्वावर जबाबदारी निश्चित करणे आणि संघटन पुन्हा उभे करणे, या दिशेने निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे.

## थेऊर-आव्हाळवाडी जिल्हा परिषद गटात विकासाऐवजी सहली व पार्ट्यांवरच खर्च

पान १ वरुन


मात्र, या अपक्ष उमेदवारांपैकी कोण उमेदवारी अर्ज मागे घेणार आणि कोण शेवटपर्यंत निवडणूक रिंगणात टिकणार, याबाबत अद्याप स्पष्ट चित्र समोर आलेले नाही. त्यामुळे अर्ज माघारीच्या कालावधीनंतरच या गटातील अंतिम लढतीचे स्वरूप स्पष्ट होणार आहे.

**निवडणूक आयोग कारवाई कधी करणार?**

विकासकामांच्या नावावर निवडून येणाऱ्या प्रतिनिधींनी मूलभूत प्रश्नांकडे पाठ फिरवली असताना, निवडणुकीच्या काळात मात्र सहली व पार्ट्यांवर बेहिशोबी खर्च होत असल्याचे चित्र दिसत आहे. निवडणूक आयोगाच्या स्पष्ट मार्गदर्शक सूचनांचा भंग होत असतानाही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने आयोगाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोग कारवाई कधी करणार, आणि खर्च मर्यादेचा भंग करणाऱ्यांवर कधी दंडात्मक पावले उचलली जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सहलींना की विकासाला मतदार कौल देणार, याचे उत्तर येत्या काही दिवसांत मतपेटीतूनच मिळणार आहे.

## पराभवानंतर वसंत मोरे आक्रमक; निवडणूक प्रक्रियेवरच धमाका करणार?

**पुणे, ता. २५ :** कात्रजचे माजी नगरसेवक आणि पुण्याचे डॅशिंग नेते म्हणून ओळखले जाणारे वसंत मोरे पराभवानंतर शांत बसण्याऐवजी थेट निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करत आक्रमक भूमिका घेतली आहे. गेल्या काही दिवसांपासून ते सातत्याने निवडणूक यंत्रणा आणि अंतर्गत राजकारणावर टीका करत आहेत.



या पार्श्वभूमीवर वसंत मोरे यांनी सोशल मीडियावर एक सूचक पोस्ट करत पुण्याच्या राजकारणात खळबळ उडवली आहे. संविधानाने मला दिलेला अधिकार (लेखणीचा) येत्या आठवड्यात पुण्यात धमाका करणार आहे. तयारी पूर्ण झाली आहे, आता काउंटडाऊन सुरू, असे म्हणत त्यांनी पेनाचा फोटो शेअर केला. या पोस्टमुळे ते नेमके काय पाऊल उचलणार, याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क सुरू झाले आहेत.

मोरे यांनी पराभवामागे थेट अंतर्गत कट असल्याचा आरोपही केला आहे. माझा पराभव करण्यासाठी प्रशांत जगताप यांनी भाजपसोबत हातमिळवणी केली, असा गंभीर आरोप त्यांनी केला. गरज नसताना आपल्या प्रभागात अनेक उमेदवार उभे करण्यात आले, त्यामुळे मतांचे विभाजन झाले, असा त्यांचा दावा आहे. एका ठिकाणी एक उमेदवार पुरेसा असताना माझ्याच प्रभागात तीन आणि दोन असे एकूण पाच उमेदवार का दिले? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

या आरोपांमुळे ठाकरे गटातील अंतर्गत मतभेद उघड झाले असून, पुण्याच्या राजकारणात नव्या संघर्षाची चिन्हे दिसू लागली आहेत. वसंत मोरे यांच्या पुढील भूमिकेकडे आता सर्वांचे लक्ष लागले असून, येत्या आठवड्यात ते नेमका कोणता धमाका करणार, याची उत्सुकता वाढली आहे.

# पालकमंत्री नितेश राणेंच्या रणनीतीने भाजप-शिवसेनेला बिनविरोध यश

## ५ जिल्हा परिषद आणि ६ पंचायत समिती जागांचा समावेश

**सिंधुदुर्ग, ता. २५ :** कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीने सुरुवातीलाच आघाडी घेत विरोधकांना जोरदार धक्का दिला आहे. भाजप नेते व पालकमंत्री नितेश राणे यांच्या नेतृत्वाखाली, तसेच माजी मुख्यमंत्री आणि खासदार नारायण राणे यांच्या राजकीय प्रभावाखाली जिल्ह्यात तब्बल ११ जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यात ५ जिल्हा परिषद आणि ६ पंचायत समिती जागांचा समावेश असून, सिंधुदुर्गच्या राजकारणात राणे कुटुंबाची पकड पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.




निवडणूक प्रक्रिया सुरू होताच अनेक ठिकाणी विरोधकांनी माघार घेतल्याने भाजप-शिवसेना महायुतीला थेट यश मिळाले. जिल्हा परिषदेत खारेपाटणमधून प्राची इस्वालकर, बांद्यातून प्रमोद कामत, जानवलीतून रुहिता राजेश तांबे, पडेलमधून सुयोगी रवींद्र घाडी आणि बापर्डेतून अवनी अमोल तेली हे उमेदवार बिनविरोध निवडून आले. यातील बहुतांश जागा भाजपने राखल्या असून, एका जागेवर शिवसेनेचा उमेदवार निवडून आला आहे.

पंचायत समित्यांमध्येही महायुतीचे वर्चस्व स्पष्टपणे दिसून आले. कणकवली, देवगड आणि वैभववाडी तालुक्यांतील विविध गणांमधून भाजपचे उमेदवार बिनविरोध झाले आहेत. यामध्ये कणकवली (वरवडे) येथून सोनू सावंत, देवगड तालुक्यातील पडेल, नाडण आणि बापर्डे येथून अनुक्रमे अंकुश ठूकरूल, गणेश राणे आणि संजना लाड, तसेच वैभववाडी (कोकीसरे) येथून साधना नकाशे यांचा समावेश आहे.

या घडामोडींमुळे जिल्ह्यातील विरोधी पक्षांची संघटनात्मक कमजोरी पुन्हा उघड झाली आहे. नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांमध्येही राणे कुटुंबाचे वर्चस्व दिसून आले होते. आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकां मध्येही त्याच प्रवाहाची पुनरावृत्ती होताना दिसत आहे.

दरम्यान, अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २७ जानेवारी असल्याने येत्या काही दिवसांत आणखी राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता आहे. मात्र, निवडणुकीच्या सुरुवातीलाच मिळालेल्या या बिनविरोध विजयां मुळे महायुतीला मानसिक आणि राजकीय आघाडी मिळाली असून, सिंधुदुर्गमध्ये नितेश राणे यांनी पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली आहे.

# पुण्यात नायलॉन मांजाने तरुणाचा गळा कापला

**पुणे, ता. २५ :** पुणे शहरात मकर संक्रांतीनंतरही नायलॉन मांजामुळे होणारे अपघात थांबत नसल्याचे चित्र आहे. स्वारगेट परिसरात अलीकडेच घडलेल्या एका घटनेमुळे पुन्हा एकदा सुरक्षेचा प्रश्न समोर आला आहे. पतंग उडवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नायलॉन मांजामुळे नागरिकांचे जीव धोक्यात येत असून, अशा घटना वारंवार घडत आहेत.

स्वारगेट भागातील देशभक्त स्व. केशवराव जेधे उड्डाणपुलावरून दुचाकीवरून जात असलेल्या एका तरुणाला नायलॉन मांजामुळे गंभीर दुखापत झाली. संकेत बोथरा (वय ३०, रा. धनकवाडी) असे जखमी तरुणाचे नाव आहे. दोन दिवसांपूर्वी संध्याकाळी सुमारे ६:०० वाजता संकेत आपल्या मोटारसायकलवरून उड्डाणपुलावरून जात होता. यावेळी अचानक नायलॉन मांज त्याच्या गळ्यात आणि उजव्या हाताला अडकली.

संकेतने ती दोरी बाजूला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोच मांज जवळून जाणाऱ्या दुसऱ्या वेगवान वाहनाला अडकला. त्यामुळे दोरीवर जोराचा ताण आला आणि संकेतच्या उजव्या अंगठ्याला खोल जखम झाली. या अपघातात त्याच्या अंगठ्यातील नसा तुटल्या असून अंगठा मोठ्या प्रमाणात जखमी झाला आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांच्या मदतीने संकेतला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तातडीची शस्त्रक्रिया करून त्याच्यावर उपचार केले. सध्या त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे, मात्र पुढील उपचार काही काळ सुरू राहणार आहेत. या घटनेनंतर नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. नायलॉन मांज विक्री आणि वापरावर बंदी असतानाही ती सर्रासपणे वापरली जात असल्याने प्रश्न उपस्थित होत आहेत.

# रामवाडी-वाघोली मेट्रो विस्तार पुढे सरसावला एलिव्हेटेड मेट्रो व ६ पदरी रस्त्यासाठी निविदा जाहीर

**पुणे, ता. २५ :** महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) ने पुणे मेट्रो लाईन २ च्या रामवाडी-वाघोली (विठ्ठलवाडी) विस्तार प्रकल्पाच्या बाबतीत महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. रामवाडी-वाघोली (विठ्ठलवाडी) विस्तारा‌अंतर्गत ४.८ किलोमीटर लांबीचा उन्नत मेट्रो व्हायाडक्ट आणि त्याच संरचनेवर पहिल्या स्तरावर ४.७ किलोमीटर लांबीचा सहापदरी एलिव्हेटेड रस्ता उभारण्यासाठी डिझाइन व बांधकामाची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या एलिव्हेटेड रस्त्यामुळे पूर्व पुण्यातील वाढती वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असून सार्वजनिक वाहतूक अधिक वेगवान, सुरक्षित आणि सुलभ होण्यास मदत होणार आहे. निविदेमध्ये चार उन्नत मेट्रो स्थानकांच्या संरचनात्मक कामाचा समावेश आहे. यामध्ये विमाननगर, सोमनाथनगर, खराडी बायपास आणि तुळजाभवानी ही स्थानकेप्रस्तावित आहेत. ही स्थानके विमाननगर-खराडी-वाघोली परिसरातील वाढत्या लोकवस्तीला मेट्रो सेवेशी थेट जोडणारी ठरणार आहेत.



आयटी हब, व्यावसायिक संकुले आणि मोठ्या निवासी भागांना मेट्रो जोडणी मिळाल्याने दैनंदिन प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. महामेट्रोच्या माहितीनुसार, लेटर ऑफ अवॉर्ड जारी झाल्यानंतर या प्रकल्पाची कामाची मुदत ४२ महिने निश्चित करण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया ५ मार्च २०२६ रोजी उघडली जाणार असून त्यानंतर कंत्राटदाराची निवड केली जाईल.

या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे मेट्रो आणि सहापदरी रस्ता एकाच उन्नत संरचनेत उभारण्यात येणार आहेत. यामुळे जागेचा कार्यक्षम वापर होणार असून भूसंपादनाची गरज मर्यादित राहणार आहे. या सहापदरी एलिव्हेटेड रस्त्यामुळे पुणे-अहिल्यानगर रोडवरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच मेट्रो व्हायाडक्टमुळे सार्वजनिक वाहतुकीस बळकटी मिळणार आहे.

विमाननगर, खराडी आणि वाघोली परिसरातील नागरिक, नोकरदार, आयटी कर्मचारी, व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांना या प्रकल्पाचा मोठा लाभ होणार आहे. मेट्रो नेटवर्कच्या विस्तारासोबतच रस्ते पायाभूत सुविधा बळकट झाल्याने पुण्याच्या सर्वांगीण शहरी विकासाला गती मिळणार आहे. या विस्तार प्रकल्पामुळे पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेला चालना मिळणार असून खासगी वाहनांचा वापर कमी होऊन इंधन बचत, प्रदूषणात घट आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण मिळण्यास मदत होईल. बांधकाम ादरम्यान आधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षिततेचे कडक निकष राबवले जाणार आहे.

प्रवाशांच्या सोयीसाठी स्थानकांवर लिफ्ट, एस्केलेटर, दिव्यांगांसाठी सुलभ सुविधा, स्मार्ट तिकीट प्रणाली आणि एकात्मिक फीडर सेवा प्रस्तावित आहेत. तसेच एलिव्हेटेड रस्त्यामुळे आपत्कालीन सेवांसाठी जलद मार्ग उपलब्ध होणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पूर्व पुण्यातील दैनंदिन प्रवास अधिक सुकर, सुरक्षित आणि वेळेत होईल, असा विश्वास नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

# मुळा-मुठा नदीकाठी नंदनवन प्रकल्पाची पहिली पायरी पूर्ण; महापालिकेच्या प्रकल्पाचा पहिला टप्पा यशस्वी

**पुणे, ता. २५ :** मुळा-मुठा नदीकाठ सुधार प्रकल्पाच्या संगमवाडी ते बंडगार्डन या नवव्या टप्प्यातील बहुतांश काम पूर्णत्वाकडे गेले असून, या टप्प्यातील सुमारे दीड किलोमीटरचा पथदर्शी भाग प्रजासत्ताकदिनी नागरिकांसाठी खुला केला जाणार आहे. संगमवाडी येथील नदीवरील पुलापासून बंडगार्डन येथील गणेश घाटापर्यंत हा विकसित केलेला परिसर आता पुणेकरांना प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे. उर्वरित काम पूर्ण करून ३१ मार्च २०२६ पर्यंत संपूर्ण ३.७ किलोमीटरचा नववा टप्पा खुला करण्याचे उद्दिष्ट महापालिकेने ठेवले आहे.

हा प्रकल्प ६ मार्च २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमि पूजन करून सुरू झाला होता. मुळा,




मुठा आणि दोन्ही नद्यांच्या संगमाचा परिसर मिळून दोन्ही बाजूंना एकूण ४४ किलोमीटर लांबीचा नदीकाठ विकसित करण्याची ही महत्त्वाकांक्षी योजना आहे. सध्या तीन टप्प्यांमध्ये १७.८ किलोमीटरचे काम सुरू आहे. संगमवाडी ते बंडगार्डन हा पहिला प्रत्यक्ष कार्यान्वित होणारा भाग असल्याने त्याकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

या टप्प्यातील कामाला सुरुवातीला अडथळेही आले. संगमवाडी स्मशानभूमीजवळील संरक्षण विभागाची जमीन ताब्यात घेण्यासाठी महापालिकेला बराच काळ प्रयत्न करावे लागले. अलीकडे ही जागा मिळाल्यानंतर कामाला वेग आला. बंडगार्डनच्या गणेश विसर्जन घाटापासून काम सुरू करून दीड किलोमीटरचा परिसर आता पूर्ण झाला आहे. नवीन विकसित केलेल्या नदीकाठावर जॉगिंग ट्रक, बसण्यासाठी पायऱ्या, मोकळ्या जागा, देशी वृक्षांची लागवड आणि आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. संगम परिसरात उष्णतेने गरम न होणाऱ्या विशेष दगडाच्या पायऱ्या बांधण्यात आल्या असून, एकावेळी सुमारे दोन हजार नागरिक येथे बसू शकतील, असा दावा महापालिकेचा आहे. शहराच्या मध्यभागात निसर्गाशी जोडलेली, सुरक्षित आणि सार्वजनिक वापरासाठीची अशी जागा उपलब्ध होणे हे या प्रकल्पाचे खरे महत्त्व आहे. भविष्यात या नदीकाठाचा उपयोग विरंगुळा, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनासाठी पुणेकरांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

# ठाकरे गटाचे ४ नगरसेवक बेपत्ता; रस्त्यावर झळकले हरवल्याचे पोस्टर्स

**मुंबई, ता. २५ :** कल्याण-डोंबिवली महापालिकेत सत्तास्थापने पूर्वीच राजकीय वातावरण तापू लागलं असून, नगरसेवकांच्या कथित पळवापळवीमुळे मोठी खळबळ उडाली आहे. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत ठाकरे गटाचे ११ उमेदवार विजयी झाले आहेत. मात्र त्यापैकी काही नगरसेवक अचानक संपर्काबाहेर गेल्याने संशय आणि राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे.

१६ तारखेपासून मधुर म्हात्रे, कीर्ती ढोणे, राहुल कोट आणि स्वप्नील केणे या चार नगरसेवकांशी कोणताही संपर्क होत नसल्याचा दावा ठाकरे गटाने केला आहे. फोन बंद, घरी अनुपस्थिती आणि कुठलीही



पूर्वकल्पना न देता गायब झाल्याने पक्षात अस्वस्थता पसरली आहे. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी कोळशेवाडी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. मात्र पोलिसांकडून अपेक्षित गतीने शोधमोहीम सुरू नसल्याचा आरोप पक्षाकडून करण्यात येत आहे.

महापालिकेतील सत्तास्थापनेच्या गणितात प्रत्येक नगरसेवक महत्त्वाचा असल्याने या प्रकरणाला अधिक राजकीय वजन प्राप्त झालं आहे. याच कारणामुळे हे नगरसेवक दबावाखाली किंवा फुस लावून दूर ठेवले जात असल्याचा संशय ठाकरे गटाने व्यक्त केला आहे. पोलिसांच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त करत खासदार संजय राऊत यांनी आक्रमक पवित्रा घेतला. पोलिसांनी तातडीने शोध घेतला नाही, तर शिवसेना स्टाईलने उत्तर शोधू, असा इशारा त्यांनी दिला होता.

यानंतर आज कल्याण पूर्व परिसरात ठाकरे गटाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. विविध ठिकाणी बेपत्ता नगरसेवकांचे फोटो असलेले पोस्टर लावण्यात आले असून, कुणालाही माहिती असल्यास शिवसेना शाखेशी संपर्क साधण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. या पोस्टरबाजीमुळे शहरात राजकीय वातावरण अधिक तापलं आहे.

दरम्यान, बेपत्ता नगरसेवकांचे कुटुंबीय आणि नातेवाईकही चिंतेत असून, पोलिसांनी तातडीने प्रभावी शोधमोहीम राबवावी अशी मागणी करत आहेत. या प्रकरणात पोलीस नेमकी काय भूमिका घेतात आणि सत्तास्थापनेपूर्वी हे प्रकरण कोणत्या वळणावर जातं, याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे.







Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

**प्राईम लाईफ**



## वजन कमी होण्यासाठी आहारात भाकरीचा समावेश गरजेचा

आहारामध्ये भाकरी समाविष्ट करण्याचे खूप सारे फायदे आहेत. आपल्या आहारात भाकरीचा समावेश करणे म्हणजे अनेक रोगांवर मात करणे. भाकरी आपल्या शरीरासाठी खूप पौष्टीक मानली जाते. वजन कमी कमी करण्यासाठी खूप प्रकारची विविध डाएट करण्यापेक्षा योग्य आहार घेणे हे गरजेचे आहे. वजन कमी करण्यासाठी काहीच न खाण्यापेक्षा जे खातोय ते योग्य खातोय का हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. सध्या कुमारवयीन मुलांपासुन ते सर्वांचेच वजन वाढु लागलेलं आहे. वजनवाढीची ही समस्या सध्या मोठ्या प्रमाणात भेडसावु लागली आहे.

वजन कमी करण्यासाठी भाकरी का खायला हवी?

मुख्य म्हणजे ज्वारी, बाजरी, नाचणी या पीठांमध्ये फायबरचे प्रमाण हे खूप असते. त्यामुळेच वजन कमी करण्यासाठी या पीठांची भाकरी ही उत्तम मानली जाते.

दोन धान्यांचे पीठ एकत्र करुन भाकरी करणे हे कायम हितावह असते. त्यामुळे आपल्याला दोन्ही पीठांच्या पोषक तत्वाचा लाभ मिळतो.

वजन कमी करण्याचा विचार केला तर गव्हाच्या पिठाची चपाती कमी खाण्याचा सल्ला दिला जातो. कारण गव्हाच्या पिठात फायबर आणि इतर पोषक तत्वांचे प्रमाण चांगले असते, परंतु त्यात कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असते. तसेच काही लोकांना गव्हाची ॲलर्जी असते.

आपण वजन कमी करण्याच्या बाबतीत दोन्ही भाकऱ्यांमध्ये फरक जाणून घेऊया. पोषणाच्या बाबतीत दोघांमध्ये कोणताही महत्त्वाचा फरक नाही. १०० ग्रॅम ज्वारीच्या पिठाबद्दल बोलायचे झाले तर, त्यात ९.७ ग्रॅम फायबर, ७२ ग्रॅम कार्ब्स आणि ३६० कॅलरीज असतात.

मक्याच्या पीठाबद्दल बोलायचे झाले तर, त्यात ७ ग्रॅम फायबर, ६.८ ग्रॅम प्रथिने, ७७ ग्रॅम कार्ब्स असतात आणि कॅलरीजचे प्रमाण प्रति १०० ग्रॅम सुमारे ३६० असते.

चपाती की भाकरी असा प्रश्न वजन कमी करणाऱ्या प्रत्येकाला पडतो. चपातीपेक्षा भाकरी ही पचनासाठी सुलभ असते. त्यामुळेच वजन कमी करण्यासाठी भाकरी खाण्याचा सल्ला हा दिला जातो. चपाती करताना तेलाचा वापर हा बऱ्यापैकी होतो, तेच भाकरी करताना मात्र तेल लागत नसल्यामुळे वजन कमी करण्यासाठी भाकरी ही सर्वात उपयुक्त मानली जाते.

वजन कमी करण्यासाठी ज्वारी आणि मक्याची भाकरी मोठ्या प्रमाणात खातात, कारण सामान्यतः गव्हाच्या पिठाच्या चपात्यांपेक्षा या भाकऱ्या जास्त फायदेशीर मानल्या जातात. तसेच त्यात कार्बोहायड्रेट्स आणि कॅलरीज कमी असतात.

# शिरूरमध्ये मांडवगण फराटा-वडगाव रासाई गटात चौरंगी लढत; स्वाभिमानी विकास आघाडीमुळे चुरस वाढली

**योगेश मारणे**

मांडवगण फराटा, ता. २५ : शिरूर तालुक्याच्या पूर्व भागातील मांडवगण फराटावडगाव रासाई जिल्हा परिषद गटामध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, यंदाची निवडणूक अत्यंत चुरशीची आणि बहुरंगी ठरण्याची चिन्हे दिसत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार व शरदचंद्र पवार) दोन्ही गट एकत्र आल्यानंतर उमेदवारी नाकारण्यात आल्याने नाराज नेत्यांनी एकत्र येत स्वाभिमानीविकासआघाडीचीस्थापन केल्याने राजकीय समीकरणे पूर्णतः बदलली आहेत.

मागील अनेक निवडणुकांमध्ये मांडवगण फराटा हा जिल्हा परिषद गट एकसंघ राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जात होता. मात्र पक्षफुटीनंतर राष्ट्रवादीचे दोन गट अस्तित्वात आल्यानंतर अनेक कार्यकर्ते व नेते अजित पवार गटात सहभागी झाले, तर माजी आमदार ड. अशोक पवार हे शरदचंद्र पवार गटात ठामपणे कायम राहिले. आतापर्यंत झालेल्या निवडणुकांमध्ये २०२४ च्या विधानसभा निवडणुकीचा अपवाद वगळता, अशोक पवार यांच्या भूमिकेला मान देत त्यांच्याशी संबंधित उमेदवार विजयी झाले आहेत.

महापालिका निवडणुकीनंतर दोन्ही राष्ट्रवादी गट एकत्र आल्यानंतर या भागात अशोक पवार यांच्या सौभाग्यवती सुजाता पवार यांना घड्याळ चिन्हावरून उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या गटातील अनेक इच्छुकांना डावलण्यात आल्याने त्या नेत्यांची तीव्र नाराजी उफाळून आली.




त्यामध्ये प्रामुख्याने घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादा पाटील फराटे, सुधीर फराटे, राजीव फराटे पाटील, राजेंद्र गदादे,दादासाहेब कोळपे, तसेच पंचायत समितीसाठी विजेंद्र गद्रे, दीपाली नागवडे व अनुराधा घाडगे हे इच्छुक होते. उमेदवारी न मिळाल्याने या सर्वांनी एकत्र येत स्वाभिमानी विकास आघाडी स्थापन केली. या आघाडीमार्फत मांडवगण फराटा-वडगाव रासाई जिल्हा परिषद गटासाठी दादा पाटील फराटे, पंचायत समिती वडगाव रासाई गणासाठी विजेंद्र गद्रे, तर मांडवगण फराटा गणासाठी दीपाली नागवडे निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

दरम्यान, भाजपकडून जिल्हा परिषद गटासाठी सचिन शेलार यांना प्रबळ दावेदार म्हणून उमेदवारी देण्यात आली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून मच्छिंद्र गदादे हे मैदानात उतरले आहेत. याशिवाय पंचायत समितीसाठी स्वाती शिवाजी मचाले व पोपट शेलार, अनिल कांबळे, माऊली पाटोळे, विकास शेलार, पल्लवी घाडगे, अनुराधा घाडगे, लतिका वराळे, स्वाती फराटे, पूजा मचाले, अंकुश सोनवणे या प्रमुख इच्छुक उमेदवारांनीही अर्ज दाखल केले आहेत.

जिल्हा परिषदेच्या पहिल्याच कार्यकाळात जिल्हा परिषदेच्या कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या सभापती राहिलेल्या सुजाता पवार आणि गेली सुमारे ३० वर्षे राजकारणात सक्रिय असलेले दादा पाटील फराटे यांच्यातील ही लढत प्रतिष्ठेची व अस्तित्वाची मानली जात आहे. तसेच ग्रामपंचायत पातळीवर अशोक पवार यांच्या पॅनलचा पराभव करणारे भाजपचे सचिन शेलार हे माजी आमदार ॲड. अशोक पवार यांना कसा चेकमेट देतात,याकडे संपूर्ण शिरूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

थेट चौरंगी लढतीमुळे मांडवगण फराटा-वडगाव रासाई गटात यंदा प्रथमच वेगळे आणि रोचक राजकीय चित्र उभे राहिले आहे. मात्र, उमेदवारी अर्ज माघारी घेतल्यानंतरच अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

# प्रचाराकडे पाठ फिरवणाऱ्या कार्यकर्त्यांना अजितदादांनी भरसभेत फटकारले

**बारामती, ता. २५ :** महापालिका निवडणुकांनंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाल्याने राज्यातील राजकारण तापू लागले आहे. या पार्श्वभूमीवर प्रचाराचा नारळ फोडण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार आज मैदानात उतरले. मात्र प्रचाराच्या शुभारंभाच्या कार्यक्रमातच त्यांनी दोन कार्यकर्त्यांच्या अनुपस्थितीवरून जाहीर नाराजी व्यक्त करत, कार्यकर्त्यांना थेट इशारा दिल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली.

कार्यक्रमाला काही महत्त्वाचे कार्यकर्ते गैरहजर राहिल्याने अजित पवार चांगलेच संतापले. स्वतःसाठी पदं मिळवून घेणं आणि आईला नगरसेवक करून घेणं एवढ्यावरच



काम संपत नाही, पक्षासाठी जबाबदारी घ्यावी लागते, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. स्वतःचं काम झालं की संपलं असं समजू नका. उद्या येऊन दोघांना माझ्याकडे भेटायला सांगा. हे असं चालणार नाही, असे शब्द वापरत त्यांनी संघटनात्मक शिस्तीवर भर दिला. या भाषणात अजित पवार यांनी आपल्या राजकीय प्रवासाचाही उल्लेख केला. मला साहेबांमुळे आणि राजीव गांधी यांच्यामुळे संधी मिळाली. त्यामुळे मी कधीच जातपात पाहिली नाही, असे सांगत त्यांनी उमेदवार निवडीत वयोगटाला प्राधान्य दिल्याचे स्पष्ट केले. यंदा २४ ते ५५ वयोगटातील उमेदवार दिल्याने काही ज्येष्ठ कार्यकर्ते नाराज झाले असतील, हेही त्यांनी मान्य केले, मात्र आगामी काळात इतरांना संधी देण्याचे आश्वासन दिले.

विकासकामांचा पाढा वाचतानाच अजित पवार यांनी बारामती परिसरावर आपले विशेष लक्ष असल्याचे सांगितले. माळेगाव शिक्षण संस्थेसाठी ५ कोटींचा सीएसआर निधी, ३९४ कोटींचे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, ३२५ कोटींचे कॅन्सर हॉस्पिटल, ५२५ कोटींच्या पशुवैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा आणि ९४ कोटींची डॉग स्क्वॉड व्यवस्था यांचा त्यांनी उल्लेख केला. माझा व्याप वाढला असला तरी माझं लक्ष इथेच आहे. मी हलक्या कानाचा नाही, असे सांगत त्यांनी पक्षांतर्गत नाराजी आणि विरोधकांच्या हालचालींनाही उत्तर दिले.

# पिंपरीत १८ वर्षीय तरुणाला गट्टूने मारहाण

**पिंपरी, ता. २५ :** पिंपरी-चिंचवड शहरात गुन्हेगारांना पोलिसांचा धाक उरला आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित करणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. केवळ दारू पिण्यासाठी पैसे दिले नाहीत म्हणून एका १८ वर्षीय तरुणाला आणि त्याच्या नातेवाईकांना सिमेंटच्या गट्टूने बेदम मारहाण करण्यात आली.

बुधवारी रात्री साडेदहाच्या सुमारास साबिर अली मनिहार हा तरुण त्याच्या आजारी काकांसाठी औषधं घेऊन घरी जात होता. औषधांच्या पिशव्या हातात असताना गोल्डन चौक परिसरात त्याला तिघांनी अडवले. आम्हाला दारू प्यायची आहे, पैसे काढ, अशी थेट मागणी त्यांनी केली. साबिरने पैसे देण्यास नकार देताच टोळक्याने 'भाईगिरी' दाखवायला सुरुवात केली. लक्ष्या




कांबळे आणि त्याच्या साथीदारांनी साबिरला बेदम मारहाण केली आणि रागाच्या भरात रस्त्यावरील सिमेंटचा गट्टूने हल्ला केला.

मुलाला मारहाण होत असल्याचे पाहून मदतीला धावून आलेल्या साबिरच्या नातेवाईकांनाही या गुंडांनी सोडले नाही. त्यांनाही बेदम मारहाण करण्यात आली. पिंपरी पोलिसांनी या प्रकरणी वेगाने हालचाली करत करण दोढे या १८ वर्षीय आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत, तर चेतन पात्रे आणि लक्ष्या कांबळे अद्याप फरार असून अधिक तपास पोलिस करत आहेत.

# पुण्यात थाई स्पाच्या नावाखाली सेक्स रॅकेट; ५ तरुणींना पकडले

**पुणे, ता. २५ :** पुण्यासारख्या शिक्षणआणिसांस्कृतिकओळखीच्या शहरात थाई स्पाच्या नावाखाली सुरू असलेला देहव्यापाराचा प्रकार पुन्हा एकदा समोर आल्याने शहरात अस्वस्थता पसरली आहे. विमाननगर परिसरातील एका नामांकित वस्तीमध्ये, बाहेरून सर्व काही कायदेशीर आणि आकर्षक दिसणाऱ्या स्पा सेंटरमध्ये प्रत्यक्षात काय चाललं होतं, याचा उलगडा विमानतळ पोलिसांच्या कारवाईत झाला आहे. या प्रकरणी ५ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, मुख्य सूत्रधाराला अटक करण्यात आली आहे.

विमाननगर येथील दत्त मंदिर चौकाजवळ असलेल्या गुलमोहर रेजन्सी इमारतीतील सिग्नेचर थाई स्पाबाबत काही दिवसांपासून तक्रारी येत होत्या. मसाजच्या आडून संशयास्पद हालचाली सुरू असल्याचं नागरिकांकडून पोलिसांच्या निदर्शनास आणून देण्यात आलं होतं. या तक्रारी दुर्लक्षित न करता पोलिसांनी गुप्त तपास सुरू केला. खात्री झाल्यानंतर शनिवारी सायंकाळी नियोजनबद्ध पद्धतीने छापा टाकण्यात आला.

छापेमारी दरम्यान स्पा सेंटरमध्ये पाच तरुणी देहव्यवसाय करत असल्याचं आढळून आलं. यावेळी मुख्य आरोपी मेहबूब खान लष्कर (वय २८, रा. आसाम) याला ताब्यात घेण्यात आलं. चौकशीत त्याने जास्त कमाईचं आमिष दाखवून तरुणींना स्पामध्ये काम देण्याच्या नावाखाली देहव्यापारात ढकलल्याचं स्पष्ट झालं. ग्राहकांकडून मिळणाऱ्या पैशांवरच त्याची उपजीविका चालत असल्याची माहितीही समोर आली आहे.

# स्वर्गीय बाळासाहेब ठाकरेंच्या जयंतीनिमित्त तीर्थाटन योजना सुरू

**मुंबई, ता. २५ :** स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त एसटी संगे तीर्थाटन योजना सुरू करण्यात येत आहे. सर्वसामान्य प्रवाशांना परवडेल, अशा दरात धार्मिक पर्यटन करता येणार असल्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार ही योजना स्वस्त आणि सुरक्षित या ब्रीदवाक्यावर आधारित असून, त्यामध्ये सर्व सवलती, योजना जशाच्या तशा लागू राहणार आहेत. तीर्थाटन योजनेअंतर्गत प्रत्येक आगार कार्यक्षेत्रातून ४० प्रवाशांचा गट तयार करून, त्यांच्या सामाजिक सवलतीच्या तिकीट दरात सहली आयोजित केल्या जाणार आहेत. या सहलींसाठी एसटीच्या नव्या,



सुरक्षित आणि आरामदायी बसेस उपलब्ध करून देण्यात येणार असून, प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे.

२३ जानेवारी २०२६ पासून ही योजना राज्यातील २५१ आगारांत एकाच वेळी राबविण्यात येणार आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार प्रत्येक आगारातून किमान पाच बसेस या योजनेसाठी उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याने, राज्यभरात एका दिवशी सुमारे एक हजार ते बाराशे धार्मिक व पर्यटन विशेष बसगाड्या धावणार आहेत.

प्रवाशांच्या मागणीनुसार अष्टविनायक दर्शन, ११ मारुती दर्शन, पंढरपूर-अक्कलकोट, तुळजापूर, कोल्हापूर-पन्हाळा-जोतिबा, गणपतीपुळे, शेगाव, शिर्डी अशा विविध श्रद्धास्थळांच्या सहली आयोजित केल्या जाणार आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व अध्यात्मिक वैभवाचा अनुभव घेण्याची ही एक सुवर्णसंधी ठरणार आहे.

# पाच दिवसांचा आठवडा करा मागणीसाठी सरकारी बँकेचे कर्मचारी जाणार संपावर

**पुणे, ता. २५ :** कामकाजाचा आठवडा पाच दिवसाचा करावा आणि इतर मागण्यासाठी सरकारी बँक कर्मचाऱ्यांच्या संघटनेने २७ जानेवारी रोजी संप करण्याचा निर्णय घेतला आहे. जर कर्मचाऱ्यांनी खरोखरच २७ जानेवारी रोजी संप केला तर बँकांच्या कामकाजावर सलग तीन दिवस परिणाम होणार आहे.

कारण २५ आणि २६ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी आहे. सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँकांनी आपल्या ग्राहकांना या संदर्भात माहिती दिली आहे. बँक कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी बुधवारी आणि गुरुवारी मुख्य कामगार आयुक्ताबरोबर यासंदर्भात चर्चा केली आहे.यावेळी अर्थ




मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तपशिलात चर्चा होऊनही यासंदर्भात तोडगा निघू शकला नाही. त्यामुळे आम्ही संप करण्याचा निर्णय घेतला आहे, असे कामगार संघटनांनी सांगितले आहे. सध्या बँक कर्मचाऱ्यांना दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी सुट्टी असते. त्याचबरोबर रविवारी सुट्टी असते.

मात्र सर्व शनिवारी सुट्टी असावी असे बँक कर्मचाऱ्यांनी म्हटले आहे. मार्च २०२४ मध्ये वेतन करारावेळी आमच्या या मागणीला बँकांच्या वरिष्ठ व्यवस्थापनाने सकारात्मक प्रतिसाद दिला होता. मात्र त्यानंतर या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे आम्हाला हा संप करावा लागत असल्याचे सांगण्यात आले. बँक कर्मचाऱ्यांच्या संघटनेने म्हटले आहे की, रिझर्व बँक, एलआयसी, जीआयसी, शेअर बाजार आणि इतर काही सरकारी कार्यालयात पाच दिवसाचा आठवडा असतो. त्यामुळे बँक कर्मचाऱ्यांना पाच दिवसाचा आठवडा असावा. हा संप सरकारी बँकातील कर्मचाऱ्यांचा आहे. त्यामुळे खासगी क्षेत्रातील बँकांच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता नाही.

# सोरतापवाडी येथे सरपंचाच्या सुनेची गळफास घेऊन आत्महत्या

## सासरच्या चौघांवर गुन्हा दाखल

**उरुळी कांचन ता. २५ :** लोकप्रतिनिधीपद भूषवणाऱ्या कुटुंबातूनच हुंडाबळीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सोरतापवाडी (ता. हवेली) येथील विद्यमान महिला सरपंचांच्या सुनेने हुंड्यासाठी होणाऱ्या अमानुष छळाला कंटाळून गळफास घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

सोरतापवाडी (ता. हवेली) ग्राम पंचायत हद्दीतील कडवस्ती परिसरात शनिवारी (ता. २४) सायंकाळी ही घटना घडली. दिप्ती रोहन चौधरी असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात विद्यमान सरपंच सासू सुनिता कारभारी चौधरी, पती रोहन कारभारी चौधरी, सासरे कारभारी चौधरी व दीर रोहित कारभारी चौधरी (सर्व रा. कडवस्ती, सोरतापवाडी) यांच्याविरुद्ध BNS कलम ८०, १०८, ८५, ८९,



३५२, ३५१(३), ११५(२), ३(५) अंतर्गत गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी मृत दिप्ती चौधरी यांची आई हेमलता बाळासाहेब मगर (वय ५०, रा. मगरपट्टा सिटी, हडपसर, पुणे) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिप्ती हिचा विवाह रोहन कारभारी चौधरी याच्याशी झाला होता. विवाहानंतर अवघ्याच काही दिवसांत चारचाकी गाडी घेण्यासाठी माहेरून हुंड्याची मागणी सुरू करण्यात आली. वेळोवेळी पैशांची मागणी करून पैसे घेतले जात होते. हुंड्याच्या मागणीसाठी दिप्तीचा सातत्याने मानसिक व शारीरिक छळ करण्यात येत होता.

दरम्यान, इतकेच नव्हे तर आरोपींनी पैसे घेऊन दिप्तीला जबरदस्तीने गर्भपात करण्यास भाग पाडले, तसेच सतत टोचून बोलणे, अपमान, मानसिक दबाव आणि अमानुष वागणूक दिली. दीर्घकाळ चाललेल्या या अत्याचाराला कंटाळून अखेर दिप्तीने राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपवले. याप्रकरणी चौघांवर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे करीत आहेत.

# आळंदीतील 'अमृतानुभव' पतसंस्थेत अकरा कोटी रुपयांचा महाघोटाळा

## सोनं गहाण न ठेवता कोट्यवधी लुटले; सामान्यांच्या कष्टाच्या पैशावर डल्ला

**आळंदी, ता. २५ :** तीर्थक्षेत्र आळंदीत सहकार चळवळीच्या विश्वासालाच तडा देणारा मोठा आर्थिक घोटाळा उघडकीस आला आहे. आळंदीतील चावडी चौक परिसरात असलेल्या अमृतानुभव नागरी सहकारी पतसंस्थेत तब्बल ११ कोटी ३ लाख १३ हजार ३८० रुपये रकमेचा अपहार झाल्याचे समोर आले असून, या प्रकरणाने संपूर्ण सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. भाविकांची आणि स्थानिक नागरिकांची आर्थिक उलाढाल ज्या संस्थांवर अवलंबून आहे, त्याच संस्थांमधून असा गैरप्रकार घडल्याने ठेवीदारांमध्ये प्रचंड अस्वस्थता पसरली आहे.




पोलिस तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, पतसंस्थेचे तत्कालीन व्यवस्थापक बाळू अर्जुन पवार याने आपल्या पदाचा गैरवापर करत संस्थेतील सोनार पूर्णानंद खोलम आणि ऑडिटर संजय लांडगे यांच्याशी संगनमत केले. या तिघांनी मिळून कागदोपत्री सोनेतारण कर्जाचा बनाव उभा केला. प्रत्यक्षात कोणतेही सोने गहाण न ठेवता, किंवा बनावट तपासणी अहवाल तयार करून, बोगस कर्जदारांच्या नावावर कोट्यवधी रुपयांची कर्जे मंजूर झाल्याचे दाखवण्यात आले. ही संपूर्ण रक्कम संस्थेच्या खात्यातून परस्पर काढून घेतल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. सोन्याची तपासणी आणि कर्ज मंजुरीबाबत खोटे अहवाल सादर करून संचालक मंडळाची दिशाभूल करण्यात आल्याचेही पोलिसांनी नमूद केले आहे.

पतसंस्थेचे अध्यक्ष संजय जयसिंग शिर्केयांनी दिलेल्या तक्रारीनंतर आळंदी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. हा अपहार २४ नोव्हेंबर २०२५ पूर्वीच्या कालावधीत झाल्याचे सांगितले जात असून २३ जानेवारी रोजी उशिरा तक्रार नोंदवण्यात आली. या प्रकरणात ऑडिटर संजय लांडगे आणि सोनार पूर्णानंद खोलम यांना अटक करण्यात आली असून मुख्य आरोपी बाळू पवार फरार आहे.

गेल्या काही वर्षांत राज्यभरातील नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये अशा प्रकारचे घोटाळे सातत्याने समोर येत आहेत. बनावट सोनेतारण, बोगस कर्जवाटप आणि अंतर्गत संगनमत यामुळे सामान्य कष्टकरी, शेतकरी आणि पेन्शनधारकांची आयुष्यभराची पुंजी धोक्यात येत आहे. बँकांच्या तुलनेत पतसंस्थां मधील ठेवींना असलेले विमा संरक्षण अत्यल्प असल्याने, अशा संस्था अडचणीत आल्यास ठेवीदार अक्षरशः उघडे पडतात. आळंदीतील हा घोटाळा केवळ एका पतसंस्थेचा प्रश्न नसून, सहकार व्यवस्थेतील देखरेख, ऑडिट आणि जबाबदारी यंत्रणेचे अपयश पुन्हा एकदा अधोरेखित करणारा गंभीर इशारा आहे.